15

# कोरोना महामारी आणि राज्यसंस्था

सहयोगी प्रा.डॉ.डोंगरे एल.बी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर, जि.नांदेड

मानवी इतिहासात महामारी हा काही नवीन विषय नाही. मानवी जीवनाच्या इतिहासात प्लेग सारख्या महामाऱ्या येऊन गेल्या आहेत हे ऐतिहासिक सत्य आहे. मानवी जीवनात आरोग्य अतिशय महत्त्वाची बाब आहे. म्हणुनच आरोग्यम धमसंपदा हे सुभाषीत निर्माण झाल. मानवी आरोग्य हे मानवी जीवनाची मुलभूत गरज म्हणून समोर आली आहे. जगातील बहुतांश सार्वभौम देशांनी आरोग्याला मुलभूत गरज मानुन राज्यसंस्था आरोग्याशी संबंधीत पायाभूत सोयी सुविधा नागरिकांना माफक किंवा मोफत प्रदान करतात. दुस-या महायुध्दानंतर बहुतांशी देश हे पारतंत्र्यातून स्वतंत्र झाली. जगातील सर्व खंडातील देशांनी पोलीसी राज्याच्या भुमीकेचा त्याग करुन कल्याणकारी राज्याचा स्विकार केला. कल्याणकारी राज्याच्या माध्यमातून अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, हक्क आणि पायभूत सोयी सुविधा राज्यसंस्था अधिक जबाबदारीने पार पाडत होत्या. भारतात राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्व आणि मुलभूत हक्काच्या माध्यमातून कल्याणकारी राज्याची व्याप्ती वाढत गेली. १९९० च्या दशकानंतर नव उदारमतवाद, जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाचे युग सुरु झाले. भांडवली व्यवस्थेसमोर लोटांगण घेत कल्याणकारी राज्यसंस्थांनी आपल्या कल्याणकारी धोरणाचा त्याग केला. मोफत आरोग्य सेवा हे कल्याणकारी राज्यसंस्थेचे महत्त्वाचे संसाधन होते. कल्याणकारी राज्यसंस्था ही संकल्पना कालबाहय होत असतांना संपुर्ण जगासमोर कोरोना ही माहामारी आली. कोरोना माहामारीमुळे सार्वजनिक आरोग्य आणि कल्याणकारी राज्यसंस्थेचे महत्त्व पुन्हा अधोरेखीत झाले.

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रोन यांनी वॉशिंगटन पोस्ट मधील The Pandemic has Plifed The Logic of mechanism of its Head लेखात म्हणतात मॅक्रोन यांनी सत्तेत आल्यापासून सामाजिक योजनांच्या खर्चात कपात करणे आणि भांडवली

व्यवस्था अधिक जोमाने रेटण्याचे प्रयत्न चालवले होते. सद्यस्थितीत मात्र कोरोनामुळे निर्माण झालेल्या आर्थीक व सामाजिक संकटातून वाट काढण्यासाठी कल्याणकारी योजनाच उपयुक्त ठरत आहेत. असे प्रतिपादन केले. यावरुन राज्यसंस्थेचे कल्याणकारी भुमीका सार्वजनिक आरोग्यासाठी किती महत्त्वाची आहे हे स्पष्ट होते. कोरोना माहामारीमुळे सबंध जगात सामाजिक, आर्थीक, राजकीय, मानसशास्त्रीय सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम झाले. या परिणामांची मिमांसा करतांना राज्यसंस्थेत झालेल्या बदलाचाही अभ्यास करावा लागेल. आजमितीला कोरोना माहामारीने निर्माण झालेल्या संकटाचा सामना करण्यात व्यस्त आहेत. या माहामारीमुळे आंतरराष्ट्रीय संबंधाचे आयाम, सार्वभौमत्व आणि दुर्बलता, आर्थीक स्थिती, राजकीय स्थिरता, अंतर्गत आणि बाहयगत परिस्थिती याचीही चिकीत्सा होणे महत्त्वाचे आहे. कोरोना माहामारीने मानवजातीच्या अस्तीत्वालाच धोका निर्माण करुन जगातील सर्व देशातील शासन आणि प्रशासन यंत्रणा या माहामारीसमोर हतबल झाल्या. Covid-१९ या माहामारीने जगातील नेत्रदिपक अशा विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीसमोर एक मोठे आव्हान उभे केले होते. कोरोना सारख्या माहामारीपासून बचाव करण्यासाठी Healthy People Healthy Nation हा व्यापक उपक्रम राबवून रचनात्मक आणि विधायक कार्याची आज नितांत आवश्यकता आहे.

अन्न, वस्त्र, निवारा याबरोबरच आरोग्य आणि शिक्षण हे विषय देखील महत्त्वाचे आहेत. जगातील सर्व सार्वभौम राष्ट्रांनी प्रत्येक नागरिकांना आरोग्य शिक्षण देण्याची काळाची गरज आहे. राज्यसंस्थांनी नागरिकांना आरोग्य शिक्षण देवून आरोग्याबाबत जनजागृती करुन विविध प्रतिबंधात्मक उपाय, प्रतिकारक्षमता वाढविणारे घटक, प्रतीबंधात्मक लसी, उपचारात्मक अत्याधुनिक साधने याकडे विशेष लक्ष देतांना दिसून येत आहे. नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे हे नागरिकांचे आणि राज्यसंस्थेचे कर्तव्य आहे. माझे घर माझी जबाबदारी म्हणुन राज्यसंस्थांना आपली जबाबदारी झटकून टाकता येणार नाही. कारण नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करणे हे राज्यसंस्थेचे दायीत्व आहे. कोणत्याही आजारापासून किंवा माहामारीपासून मुक्त होण्याचा नागरिकांना अधिकार आहे. आरोग्य हा विषय मुलभूत अधिकार या संकल्पनेत नसला तरी Covid-१९ या माहामारीने Right to Health चे महत्त्व अधोरेखीत केले आहे. या अधिकाराचे रक्षण करणे हे राज्यसंस्थेचे उत्तरदायीत्व आहे. हे नाकारुन चालणार नाही. प्रत्येक व्यक्तीला तिचे स्वत:चे तिच्या कुटूंबाचे आरोग्य व स्वास्थ चांगले राहिल अशा प्रकारे जीवनाचा दर्जा प्राप्त करण्याचा हक्क आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी विकासाच्या आपल्या अहवालात कोरोना एक जागतिक माहामारी घोषीत केलेली आहे. या कोरोना माहामारीचा मानवी आरोग्यावर दिर्घकालीन परिणाम होतो. प्रत्येक नागरिकांस कोरोना सारख्या माहामारीपासून मुक्त जीवन जगता यावे यासाठी राज्यसंस्था कटीबध्द राहून त्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपक्रम, कार्यक्रम, योजना तयार करुन त्यांची प्रभावी अंमलबजावणीची आवश्यकता आहे. उत्तम आरोग्य हा नागरिकांचा अधिकार आहे. भारतीय राज्यघटनेच्या ४७ व्या कलमात अशी तरतुद आहे. पोषणयुक्त आहार, उंच जीवनमान तथा सामाजिक स्वास्थ्यात सुधारणा करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. अर्थात नागरिकांच्या जीवनाचे संरक्षण आणि संवर्धन करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. Covid-१९ या माहामारीच्या आधी अनेक विषाणूजन्य आजार आले आहेत. त्यामध्ये १९४० च्या दशकात M.H.V., १९६० च्या दशकात OC ४३ असा एक कोरोना सदृश्य आजार आला होता. २००३ मध्ये सार्स सारखा श्वसनमार्गाने पसरणारा कोरोना सारखा गंभीर आजार जगाने अनुभवला आहे. २०१९ मध्ये Covid-१९ आणि सार्स सारखे आजार आले. Covid-१९ च्या संक्रमणाचे सर्वाधिक संक्रमण महाराष्ट्रात झाले. सार्स सारख्या गंभीर आजाराने मराठवाडयातील औरंगाबाद शहराला आपल्या विळख्यात घेतले होते. १९४० मध्ये M.H.V., १९६० मध्ये OC ४३, २००३ मध्ये सार्स आणि २०१९ मध्ये Covid-१९ यासारख्या गंभीर आजाराने जगातील सर्व राज्यसंस्थेसमोर एक मोठे आव्हान उभे केले होते. या गंभीर आजारांचा आणि माहामारीचा मानवी जीवनावर फार मोठे दुरगामी परिणाम झाले. या परिणामांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे राज्यसंस्थेवरही झ ाला. कोरोना विषाणुचा संसर्ग रोखण्यासाठी शासनाला लॉकडाऊनचा निर्णय घ्यावा लागला. या टाळेबंदीच्या काळात शासकीय कार्यालये, कामकाज, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, कारखाने, चित्रपटगृहे, पर्यटनस्थळे, जलतरणीका, विमानसेवा, बससेवा, रेल्वेसेवा यासारख्या अनेक सेवा शासनाला बंद कराव्या लागल्या. याचा परिणाम राज्यसंस्थेच्या आर्थीक तिजोरीवर पडला. यातून भारताचा G.D.P.३.१८ एवढा खाली आला होता. कोरोना माहामारीस प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्यात ज्या देशांच्या प्रमुखांनी विशेष उपाययोजना निर्माण करुन त्यांचा अंमल करण्यात यशस्वी झाले. अशा यशस्वी आणि कार्यक्षम राष्ट्रप्रमुख म्हणून त्यांचे कार्यक्षम नेतृत्व पुढे आले. त्यात इटली, जर्मनी आणि फ्रान्सच्या राष्ट्रप्रमुखांचा अनुक्रमे प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांक आहे. अमेरीकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प पेक्षा न्युयॉर्कचे गर्व्हनर आंद्रे क्युमो यांची कामगिरी सर्वोत्तम होती. कोरोना माहामारीमुळे जगातील कुशल कार्यक्षम नेतृत्वाची ओळख जगाला झाली. कोरोना माहामारीमुळे जगातील जवळपास ८४ देशांनी आणिबाणी घोषीत केली होती. या आणिबाणीमुळे जवळपास ३५ देशांनी प्रसार माध्यमांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध लादण्यात आले होते.

राज्यसंस्थांनी आपल्या सत्तेचा वापर करुन बेजाबाबदारपणे टाळेबंदी लादण्यात आली जे की सर्वसामान्य नागरिकांच्या हिताच्या विरोधी होते. टाळेबंदीमुळे गरीब, शेतकरी, कष्टकरी, मजुरांचे अतोनात हाल झाले. सर्वसामान्य माणसाच्या रोजगाराचा, उदरनिर्वाहाच्या साधनाअभावी अनेक अमानवी घटना घडल्या. ज्यामध्ये अनेक लोकांचा बळी गेला. म्हणुन टाळेबंदीचा सर्वात जास्त नकारात्मक परिणाम गरीब सर्वसामान्यांना नाहक यातना सहन कराव्या लागल्या. ज्या मृत्युपेक्षाही भयानक होत्या. टाळेबंदीच्या काळात बहुतांश राज्यसंस्थांकडून नागरिकांच्या मुलभूत हक्काची कुचंबना करण्यात आली. व्यक्ती स्वातंत्र्य आणि मत मांडण्याचे स्वातंत्र्य, खाजगी स्वातंत्र्यावर निर्बंध लादण्यात आले. यामुळे हक्क, स्वातंत्र यांची मुस्कटदाबी करण्यात आली.

कोरोना माहामारीमुळे विश्व समुदायतील राष्ट्रांनी कोरोना माहामारीबाबत चीन सारख्या देशाला जबाबदार धरण्यात आले. महासत्तावान अमेरिकेने तर कोरोना हा विषाणू चिनने आपल्या प्रयोगशाळेत तयार करुन तो संपुर्ण जगभर पसरवला असा आरोप केला. कोरोना माहामारी ही एक चीनचे जैवीक युध्द आहे. असे मत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मांडले. कोरोना माहामारीमुळे राष्ट्राराष्ट्रातील संबंध ताणल्या गेले. कोरोना माहामारीमुळे संपुर्ण जगातील निवडणूका पुढे ढकलण्यात आल्या. त्यामुळे चिली, युरोमिया, फ्रान्स, हाँगकाँग, इंडोनेशिया, इटली, न्युझीलंड, फिलीपाईन्स या देशाच्या सार्वत्रिक निवडणूका पुढे ढकलण्यात आल्या. भारतामध्येही निवडणूका पुढे ढकलण्यात आल्या. अनलॉकनंतर बिहार विधानसभा निवडणूका घेण्यात आल्या.

कोरोना माहामारीचा विकसीत राष्ट्रात ज्या पध्दतीने संसर्ग झाला. त्याच पध्दतीने भारतातही कोरोनाचा झपाटयाने संसर्ग पसरला. भारताने कोरोनाच्या प्रसाराला प्रतिबंध घालण्यासाठी २२ मार्च पासून जनता कर्फ्यु लागू करण्यात आला.

कोरोना माहामारीने संपुर्ण मानवजातीला एक प्रकारची नवी शिकवण दिली आहे. एकवीसाव्या शतकात वाढत चाललेला मानवजातीचा भोगवाद, चंगळवाद, स्वार्थीपणा, मोही लालसी समाज निर्माण झाला होता. कोरोना विषाणू हा मानवनिर्मित आहे की निसर्गनिर्मित आहे याचे उत्तर अजून सापडले नसले तरी या विषाणूने जगातील मानवाला न्यायाची ताकत दाखवून दिली. कोरोनाच्या माध्यमातून भोगवादी, चंगळवादी समाजाला निसर्ग न्यायाचा साक्षात्कार घडवून दिला आहे.

कोरोना माहामारीने राज्यांनी आरोग्याविषयी सजग आणि किती जागरुक राहावे या विषयी संकेत दिले आहे. विषाणूच्या संसर्गातून निर्माण होणा-या माहामारीवर मात करण्यासाठी समाज व शासनाची आर्थीक क्षमता बळकट करणे महत्त्वाचे आहे. दुस-यावर अवलंबून न राहता स्वत: स्वावलंबी बनने किती महत्त्वाचे आहे हे सर्वात मोठे शिक्षण कोरोना विषाणुने दिले आहे. कोरोना विषाणुचा संसर्ग रोखण्यासाठी भारताने इंग्लंड, अमेरिका बरोबरच कोव्हीड लस तयार केली. महाराष्ट्रातील सिरम इन्स्टीटयुटने सर्व क्षमता पणाला लावून कोव्हीड लस तयार केली आहे. ही भारतासाठी भुषणावह बाब आहे. भारत हा अमेरिका, इंग्लंड, चीन पाठोपाठ जगातील अनेक देशांना कोव्हीड लस निर्यात करीत आहे. यातून भारताने Vaccine Diplomacy च्या माध्यमातून शेजारील आणि अन्य राष्ट्राशी आपले राजनैतिक संबंध मजबूत करीत आहे. कोव्हीड लसीमुळे आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताची प्रतिष्ठा वाढत आहे. भारत सरकारने आणि राज्यसरकारांनी आर्थीक भार उचलनू तमाम भारतीयांना मोफत लस देवून भारतास कोरोनामुक्त करुन आपले उत्तरदायीत्व पार पाडतील अशी अपेक्षा आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

१) पाटील व्ही.बी. - मानव संसाधन विकास, के सागर प्रकाशन, पुणे २००९.

२) सुभाष कश्यप - हमारा संविधान, नॅशनल ट्रस्ट इंडीया, नई दिल्ली.

३) द वायर - १ मे २०२०

४) Government of Hongkong Dept.of Health - २२ जाने.२०२०

❑❑❑